सं.फौ.ख.क्र.८०३/२०१६

सरकार –वि–शेख मोबीन

नि.क्र.१९

**सरकार तर्फे साक्षीदार क्रमांक ०१ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो कीः–

माझे नाव – संजय पुरुषोत्तम मिर्झापुरे,

वय. ३९ वर्षे, व्यवसाय – पोलीस हवालदार ब.नं. ४९२, रेल्वे पोलीस स्टेशन शेगाव,

राहणार – शेगाव, ता. शेगाव, जिल्हा – बुलडाणा.

**सरतपासणी सरकार तर्फे श्रीमती शहा, सरकारी वकील.**

१. सन २०१६ मध्ये मी पोलीस शिपाई म्हणून रेल्वे पोलीस स्टेशन शेगाव येथे कार्यरत होतो. दि.२८.०९.२०१६ रोजी माझी ड्युटी रात्री ०८.०० ते सकाळी ०८.०० वाजेपर्यंत गुन्हेगार वॉच म्हणून लागली होती. माझ्यासोबत पोलीस उपनिरीक्षक कवडकर साहेब, पोलीस नाईक शिपाई जगदीश ठाकुर, पोलीस शिपाई किरण अघाव व अनिल बयस ड्युटीवर हजर होते. रात्री ११.०० वाजताच्या दरम्यान आम्ही अकोला एंडकडून ते जलंब एंडपर्यंत प्लाटफार्म तपासणी करीत होतो. रात्री १२.४५ वाजता आम्ही शेगाव प्लाटफार्म क्र. १व २ च्या मधात असलेल्या कॅन्टींगजवळ उभे होतो. त्यावेळेस नवीन फुटब्रीजचे काम चालू होते व फुटब्रीजच्या खाली सिमेंटचे ओटे बांधले होते. त्याठिकाणी मला दोन संशयीत इसम अंधारात बसलेले दिसले. त्यानुसार मी माझ्या सोबत ड्युटीवर असलेले उपनिरीक्षक साहेब व इतर कर्मचारांना माहिती दिली. त्यानंतर आम्ही सर्व कर्मचाऱ्यांनी मोबाईलचा टॉर्च लावून दोन संशयीत इसमांना प्लाटफॉर्म क्र. २ वर घेवून आलो. पोलीस उपनिरीक्षक कवडकर साहेब यांनी त्यांची विचारपुस केली असता त्या इसमांनी स्वतःचे नाव शेख मोबीन शेख रहेमान व दुसऱ्या इसमाने गणेश तांबोले असल्याचे सांगितले. शेख मोबीन शेख रहेमान हा सराईत गुन्हेगार आहे. दोन्ही इसमांची विचारपुस केली असता त्यांनी समाधान कारक उत्तरे दिली नाहीत. दोन्ही इसम गुन्हा करण्याच्या उद्देशाने बसले असल्याचे आम्हाला वाटले त्यामुळे मी आरोपींविरुध्द तक्रार दिली. आता मला फिर्याद व छापील एफ.आय.आर. दाखविण्यात आला. त्यावर माझ्या सह्या आहेत. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्याला **नि.क्र.२० व २१** देण्यात येते. दोन्ही इसमांवर मुंबई पोलीस कायद्याचे कलम १२२ प्रमाणे पोलीस उपनिरीक्षक साहेबांनी कारवाई केली. मी आरोपींना ओळखतो. दोन आरोपींपैकी एक आरोपी शेख मोबीन न्यायालयात हजर आहे. दुसऱ्या आरोपीला मी बघितल्यास ओळखु शकतो.

**सरतपास संपला.**

**उलटतपास आरोपी क्र. १ तर्फे श्री. बी. एस. शेगोकार, वकील यांचे मार्फत**

२. या प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक कवडकर साहेबांनी केला. तपासादरम्यान तपासी अधिकारी यांनी माझा जबाब नोंदविला होता. जबाब कोणत्या तारखेला नोंदविला होता हे आता मला आठवत नाही. आता मला अभिलेख दाखविला. त्यामध्ये माझ्या जबाबाची प्रत नाही. मी २८ च्या मध्यरात्री ०१.०० वाजता रिपोर्ट दिला होता. मी रिपोर्ट दिल्यानंतर या प्रकरणासंदर्भात तपासी अधिकारी कवडकर यांच्याशी माझा संबंध आला नाही. घटनेच्या वेळेस शेगाव रेल्वे स्टेशनवर एकुण चार कॅन्टींग होत्या. चारही कॅन्टींग २४ तास सुरु असतात. चार कॅन्टींगमध्ये २४ तास चार कर्मचारी कार्यरत असतात. हे म्हणणे खरे नाही की, पोलीस अधिक्षक, नागपुर रेल्वे यांच्याकडून कलम १२२ अंतर्गत कार्यवाही करण्याचे आदेश होते. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितल्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, वरिष्टांच्या आदेशानुसार मी खोटी केस आरोपींविरुध्द दाखल केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपी क्र. २ तर्फे श्री. व्ही. डी. पहुरकर, वकील यांचे मार्फत**

३. घटनेच्या दिवशी माझी ड्युटी असल्याबाबतचे कोणतेही दस्त मी तपासी अधिकाऱ्यांना दिले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादवर वरिष्ठ अधिकाऱ्यांना शेरा असतो. आता मला फिर्याद दाखविण्यात आली. त्यावर वरिष्ठ अधिकारी किंवा प्रभारी अधिकारी यांचा शेरा नाही. हे म्हणणे खरे आहे की, शेगाव रेल्वे पोलीस स्टेशनपासून प्लाटफॉर्मचे अंतर पाच मिनिटांचे आहे. सिमेंटच्या ओट्यावर आरोपी आम्हाला मिळून आले ही बाब फिर्यादमध्ये नमुद आहे. आता साक्षीदाराला फिर्याद दाखविण्यात आली. त्यामध्ये सिमेंटचा कट्टा नमुद आहे. साक्षीदार सांगतो की, सिमेंटचा कट्टा म्हणजेच ओटा आहे. हे म्हणणे खरे आहे की, सिमेंटच्या पोतळीला कट्टा म्हणतात. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासात सांगितलेला संपूर्ण मजकूर मी खोटा सांगितलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास काही नाही.**

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्विकृत | माझे समक्ष |
| स्वा/- | स्वा/- |
| (एन. डी. मेश्राम) | (एन. डी. मेश्राम) |
| न्या.दं.प्र.वर्ग कोर्ट क्र.१, शेगांव | न्या.दं.प्र.वर्ग कोर्ट क्र.१, शेगांव |
| दि.१७.०९.२०२५ | दि.१७.०९.२०२५ |